# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :** रमेश दाते
**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे, सत्यजित जोशी
**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे

या अंकाची किंमत : रु. १८०.००
वार्षिक वर्गणी : रु. ४००.००

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०-२४४७४२९५
ई-मेल : sci.vibha@gmail.com

या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# 'सृष्टिज्ञान' कालचे, आजचे व उद्याचे

ही दिवाळी आमच्या वाचकांना, जाहिरातदारांना, हितचिंतकांना सुखाची, समृध्दीची आरोग्यपूर्ण आणि आनंददायी जावो!

सृष्टिज्ञानचा हा नोव्हेंबर-डिसेंबर असा दोन महिन्यांचा जोड अंक आहे ९६ व्या वर्षातील हा अखेरचा अंक जाने-२०२४ पासून ९७व्या वर्षात पदार्पण करताना सृष्टिज्ञान हळूहळू नवीन स्वरुप धारण करणार आहे, हे सांगताना अतिशय आनंद होत आहे.

सृष्टिज्ञान पाया रचताना प्रा. गो. रा. परांजपे यांनी एक दृष्टिकोन समोर ठेवला होता, तो म्हणजे वैज्ञानिक संकल्पना सुलभ मराठी भाषेतून अबालवृध्दांपर्यंत पोहोचवाव्यात व त्यांच्या विचारशक्तीचा सकारात्मक ओघ ज्ञानाधिष्ठित समाजबांधणी करण्याकडे वळवावा. प्रा. गो. रा. परांजपे यांचे डॉ. वि. वा. नारळीकर, डॉ. भालचंद्र उदगावकर यांसारखे शिष्य तत्परतेने प्रा. परांजपे यांच्या मदतीस धावून आले. त्यांनी एक प्राध्यापक व वैज्ञानिकांची साखळी बनविली, जिच्या सहाय्याने सृष्टिज्ञान मासिक बहरले. ९० वर्षात ही साखळी बळकट झाली या सर्वांनी सृष्टिज्ञान म्हणजे दर्जेदार वैज्ञानिक लेख असलेले व सामान्य लोकांनाही सोप्या भाषेत विज्ञान समजावणारे मासिक असा लौकिक मिळवून दिला. या मार्गावरूनच जाण्याचा प्रयत्न आम्हीही सातत्याने करीत आहोत.

मात्र गेल्या काही वर्षात, विशेषत: कोवीड-१९ नंतर अनेक प्रकारची सामाजिक स्थित्यंतरे झाली आहेत. या बदलणाऱ्या परिस्थितीनुसार मूळ ध्येय कायम ठेवून मासिकात काही बदल करण्याचा मानस आहे. सृजनशिलता, संशोधन, प्रेरणादायी, उद्योजक व विद्यार्थ्यांसाठीचे सदर यांना स्वतंत्र स्थान असेल. त्या प्रयत्नांना आपण प्रोत्साहन द्यावे ही विनंती आहे. आता या प्रयत्नांना नवीन तंत्रज्ञानाची जोड असणे अपरिहार्य आहे. आता अंकाची ई-आवृत्ती निघत आहे. सृष्टिज्ञानच्या 'फेसबूक' पानालाही नियमित भेट देत रहा.

'विज्ञानभारती' संस्थेने सृष्टिज्ञानची सर्व जबाबदारी घेतल्यानंतर आता सृष्टिज्ञान जास्तीत जास्त लोकांपर्यंत नक्की पोहोचेल असा विश्वास आहे. यासंबंधीचे आपले विचार आमच्यापर्यंत जरूर पोहोचवावेत व

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
"Srishtidnyan" Monthly magezine owned by Vidnyan Bharati, Pune, Printed and published by Ramesh Date. Printed at Pratima Mudran, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune - 411038. Published at 1261, Shukrawar Peth, Subhashnagar, Pune - 411002.
Editor - Ramesh Date

सृष्टिज्ञानच्या पुढील वाटचालीत आपला सहभाग असावा अशीही तीव्र इच्छा आहे.

दरवर्षीप्रमाणे या दिवाळी अंकात विषयांमध्ये खूप विविधता आहे. पर्यावरण विभागात जलसाठ्यांचे पुन:निर्माण संवर्धन याची नितांत गरज व निकड असल्याचे भान करून देणारा 'तळी राखील तो' एक सुंदर लेख आहे. तर पर्यावरण रक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता सांगणारे अन्य तीन लेखसुध्दा आपले लक्ष वेधून घेतील.

पक्षी व प्राणी जगताविषयीच्या लेखांत शुष्क ऋतुमानात प्राणी/पक्षीही तहानलेले असतील याचे भान ठेवावे हा लेख आपल्याला नक्की आवडेलच पण बोलकी जीवसृष्टी प्राण्यांच्या भाषा विषयक लेख, नोंदीसाठी ध्वनीशास्त्र हे लेखसुध्दा लक्षवेधक आहेत. दुर्मिळ होत चाललेल्या खवले मांजरांच्या संवर्धनाविषयीचा उत्कंठावर्धक लेखही अन्य लेखांबरोबर आहे.

तसेच विविध महाराष्ट्रीय रुचकर पदार्थांची ओळख करुन देणारी लेखमाला ही दिवाळीसाठीसारखीच पक्वान्नांची अनुभूती वर्षभर करुन देणारी आहे. गणित बोजड विषय नसून रंजकतेनेही शिकविता येतो. याची प्रचिती देणारे लेख जरूर वाचावे असे आहेत.

वनस्पती शास्त्रातही अनेक वाचनीय लेख आहेत. सोनचाफा, दीपमाळ/कंदिलपुष्प, हे मोहक लेख आहेतच. पुस्तक परिचय विभागही यावेळी लक्षवेधक आहे. पण विज्ञानपर्यटन या विषयक लेखाला जरुर भेट द्यावी असा आहे. विज्ञानकथा दोनच आहेत पण त्यात मोठी वैज्ञानिक तत्वे सुलभतेने दिसतात.

पुनर्भेट, ५० वर्षांपूर्वी, नोबेल पुरस्कार विषयी या नेहमीच्या सदरांबरोबर भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, यांचे जोडीस संकीर्ण विषयक लेखही आकर्षक आहेत. विरंगुळा म्हणून कविता व शब्दकोडी आहेच.

ज्ञान व मनोरंजनातून विज्ञानाचा आस्वाद सर्व विज्ञानप्रेमींना घेता यावा ही दिवाळी अंकाची परंपरा चालू ठेवली आहे.

सृष्टिज्ञानची वाटचाल आनंददायी होण्यामध्ये आपणासर्व वाचक व लेखक वर्गाचा मोठा वाटा आहेच परंतु टाईपसेटींग करणारे संतोष शिंदे, सजावटकार मिलिंद जोशी व सुबक छपाई करणारे अजित ठोंबरे यांच्या सहकार्याविना हे घडले नसते. विज्ञान भारतीचे सर्व मार्गदर्शक, पदाधिकारी, स्वयंसेवक यांच्या पाठिंब्यामुळे हे काम अधिकाधिक वेगाने वाढत आहे. त्या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद.



– संपादक मंडळातर्फे

**रमेश दाते**

sci.vibha@gmail.com

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
'सृष्टिज्ञान' हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा मुद्रण, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८ येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२ येथे प्रसिध्द केले.
संपादक : रमेश दाते